दैनिक
अचूक वेध,अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३४०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.२१ जुलै २०२५




## ठाकरे आणि शिंदेंचंही मनोमिलन होणार, शिवसेनेच्या मंत्र्याचं मोठं भाकीत

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, मुंबई :** पाच जुलैल्या झालेल्या विजयी मेळाव्यात दोन्ही ठाकरे बंधू तब्बल २० वर्षांनी एकाच व्यासपीठावर आलेले पाहायला मिळाले. याचनिमित्ताने आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गट आणि मनसेच्या युतीच्या चर्चांना बळ मिळाले आहे. परंतु युतीच्या निर्णयावर अद्याप शिक्कामोर्तब झालेला नाही. यातच शिवसेनेचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी मोठं विधान केलं आहे. उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदेंचंही मनोमिलन होऊ शकतं, असे सरनाईक म्हणाले आहेत.




एकनाथ शिंदेंच्या बंडानंतर शिवसेनेत फूट पडली. दोन्ही गटातील नेत्यांकडून एकमेकांवर आरोपास्त्र डागले जात आहेत. तसेच नेत्यांमध्येही एकमेकांबाबत राजकीय वैर आहे. यामुळे दोन्ही शिवसेना एकत्र येण्याची शक्यता मावळत असतानाच प्रताप सरनाईकांनी मोठं वक्तव्य केलं आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे जसे एकत्र आले तसे उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदेही एकत्र येऊ शकतात, असे सरनाईकांनी म्हटले आहे. यामुळे राजकीय वर्तुळाच्या भुवया उंचावल्या आहेत.

दरम्यान गेल्या काही दिवसांपासून आमदारांचे वादग्रस्त व्हिडीओ समोर आले असून अधिवेशनातही हे मुद्दे गाजले आहेत. यावर देखील प्रताप सरनाईक यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आमच्या पक्षातील आमदारांकडून काही विधानं करण्यात आले, त्यामुळे एकनाथ शिंदे नाराज होते, शिंदेंनी आमदारांना सक्त सूचना देखील दिल्या आहेत. आमच्याच आमदारांच्या तक्रारी आहेत असं नाही, सगळ्याच पक्षातील आमदार बोलतात, असे सरनाईकांनी नमूद केले.

उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेवर मोठा आरोप केला होता. जादूटोणा करून आमदार निवडून आले, असा दावा ठाकरेंने केली. यावर प्रतिक्रिया देताना सरनाईक म्हणाले, तुमचे आमदार निवडून आले हे काय जादूटोणा न करता आले? आणि आमचे जादूटोणा करून आले का? तुमचे लोकसभेला खासदार जादूटोणा करूनच निवडून आले होते का? असा सवाल सरनाईक यांनी यावेळी केला. एकनाथ शिंदे शिवसेनेचे ब्रँड आहेत. आमच्या पक्षाचा ब्रँड म्हणजे एकनाथ शिंदे, असंही यावेळी सरनाईक यांनी म्हटलं आहे.

## मावा, गुटखा विक्रेत्यांना खुशखबर...
## डिवायएसपी खाडे यांची जिल्ह्यातील ट्रेनिंग पूर्ण

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.२०, अहिल्यानगर :** गेल्या काही महिन्यांपासून परीक्षाविधीन पोलीस अधीक्षक संतोष खाडे यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात अवैध व्यवसायावर चांगलाच जरब बसविला होता. मात्र संतोष खाडे यांचा जिल्ह्यातील प्रशिक्षणाचा कालावधी पूर्ण झाला आहे. शनिवारी (दि. १९) जुलै रोजी जिल्हा पोलीस प्रमुख सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व सोमनाथ वाकचौरे या अधिकाऱ्यांनी त्यांना निरोप देत पुढील प्रशिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

संतोष खाडे यांना पोलिस उप अधीक्षक पदाच्या प्रशिक्षणासाठी अहिल्यानगर जिल्ह्यात पाठवण्यात आले होते. नेवासा पोलिस ठाण्यात त्यांनी तीन महिन्यांचे प्रशिक्षण घेतले, नेवाशा नंतर जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या विशेष पथकात त्यांनी एक महिना प्रशिक्षण घेतले. अहिल्यानगर जिल्हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने राज्यात सर्वात मोठा आहे. जिल्ह्यातील राज्यकर्ते मंडळी त्याच प्रमाणे नागरिक प्रचंड जागरुक असतात. याच जिल्ह्यात काम करताना अधिकाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागते. अशीच तारेवरची कसरत प्रशिक्षणार्थी संतोष खाडे यांनी चार महिने केली. जिल्ह्यातील अवैध व्यावसायिकां विरुद्ध कारवाईचा कडक बडगा त्यांनी उगारला. त्यांनी सुगंधी तंबाखू, मावा, गुटख्याच्या ठिक ठिकाणच्या कारखान्यांवर कारवाई केली. जुगार अड्यांवर छापे टाकले, दारुचे अड्डे उद्धवस्त केले. बेकायदेशिर दारु विक्रेत्यांना चाप बसवला. गोवंशीय जनावरांची कत्तलखाने बंद करण्यास भाग पाडले. जिल्ह्यात सर्वत्रच संतोष खाडे यांनी धडाकेबाज कारवाई केल्याने अवैध व्यावसायिकांनी चांगलाच धसका घेतला होता. खाडे यांच्या प्रशिक्षणाचा कालावधी केव्हा पूर्ण होणार, असाच प्रश्न अवैध व्यवसायिकांना पडला होता.

खाडे यांनी आपल्या कार्याची चुणूक दाखवून कारवाईद्वारे भल्या भल्या अवैध व्यवसायिकांना पाणी पाजल्याने सर्वसामान्य नागरिकांतून त्यांच्या कार्याचे तोंडभरून कौतुक होत आहे. अशा कर्तबगार संतोष खाडे यांच्या चार महिन्यांचा प्रशिक्षण कालावधीचा शेवट १९ जुलै रोजी पूर्ण झाल्याने त्यांना पोलीस दलातर्फे सन्मानपूर्वक निरोप देण्यात आला.

यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक वैभव कलुबर्मे, पोलिस उप अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, पोलिस उप अधीक्षक अमोल भारती उपस्थित होते. खाडे यांचे पुढील दोन महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्या नंतर त्यांना पोलीस उप अधीक्षक पदाची नियुक्ती दिली जाणार आहे.

## नवरंग डाईंग कंपनी परिसरात सिक्युरिटी गार्डचा मृत्यू

**अक्षराज : भानुदास गायकवाड**



**दि.२०, डोंबिवली :** डोंबिवलीतील नवरंग डाईंग फेज ०१ या कंपनीमध्ये कार्यरत असलेले सिक्युरिटी गार्ड हृदयनारायण रामपाल दुबे (वय ६३) यांचा मृत्यू कंपनी परिसरात झाला असल्याची घटना घडली आहे . ही घटना २० जुलै २०२५ रोजी सकाळी घडली असल्याची माहिती अल्ताफ मोहम्मद मुलाणी (वय ६३), जे त्याच कंपनीमध्ये दिवसपाळीची ड्युटी करतात, यांनी मानपाडा पोलीस ठाण्यात दिली आहे.

मुलाणी सकाळी ७:३० च्या सुमारास ड्युटीसाठी कंपनीत पोहोचले असता, सिक्युरिटी केबिनजवळ दुबे हे पालथे पडलेले दिसून आले. त्यांनी आवाज दिल्यावर कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने जवळ जाऊन पाहिले असता, त्यांच्या डोळ्याजवळून रक्त येताना दिसले. त्यांनी लगेच कंपनीचे मॅनेजर श्री. जोशी यांना संपर्क केला. त्यानंतर कंत्राटदार राजेश पांडे व दुबे यांचा मुलगा दीपक दुबे घटनास्थळी दाखल झाले. यानंतर मानपाडा पोलिसांनी घटनास्थळी येत दुबे यांना शास्त्रीनगर रुग्णालयात नेले. मात्र, डॉक्टरांनी तपासून सकाळी १०:४० वाजता मृत घोषित केल्याचे सांगण्यात आले. प्राथमिक माहितीनुसार, भुवईवर मार लागून रक्तस्त्राव झाल्यामुळे दुबे यांचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. यासंदर्भात श्री. मुलाणी यांनी दिलेल्या जबाबात दुबे यांच्या मृत्यूबाबत कोणताही संशय व्यक्त केलेला नाही. मानपाडा पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## सेंट मायकल्स इंग्लिश स्कूलची शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी

**अक्षराज : वसंत वडस्कर**




**दि.२०, चंद्रपूर :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे द्वारे आयोजित पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी) २०२५ घेण्यात आली. यामध्ये पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (इ. ५ वी) संकल्प बन्सोड व साई दंडावर यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली. तर पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (इ. ८ वी) मध्ये सार्थ वडस्कर हा विद्यार्थी जिल्ह्यातून दुसरा क्रमांक मिळवुन पात्र ठरला आहे. तसेच पार्थ चिमूरकर, महेश बावणे, श्रेया लामगे हे विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरलेले आहेत.

मिळालेल्या यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य विकास कोल्हेकर यांनी पात्र झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच विद्यालयाने शिष्यवृत्ती परीक्षेत जास्तीत जास्त विद्यार्थी विद्यार्थ्यांनी भाग घेण्याचे आवाहन प्राचार्य विकास कोल्हेकर यांनी केले आहे.

## पांडुरंग निघाले संत सावता माळींच्या भेटीला : संतपरंपरेचा अद्वितीय सोहळा

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२०, पंढरपूर :** पांडुरंग निघाले संत सावता माळीच्या भेटीला या अभंगाप्रमाणे संत सावता माळी यांची कर्मभूमी असणाऱ्या माढा तालुक्यातील अरण या गावची आख्यायिका आहे. कामातच देव मानणाऱ्या कांदा, मुळा, भाजी आवघी विठाई माझी अशी ओळख असणाऱ्या संत सावता माळी यांच्या भेटीसाठी रविवारी कानड्या विठुरायाच्या पालखीचे अरणकडे प्रस्थान झाले.

हा सोहळा अध्यात्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या सोहळ्याचा पहिला मुक्काम पंढरपूर ते रोपळे पर्यंत असतो यामध्ये लोकप्रतिनिधी म्हणून पहिल्यांदाच आमदार अभिजीत पाटील हे पांडुरंगाच्या पालखीसोबत आणि तमाम वारकरी भाविकांसोबत जय हरी विठ्ठल नामाचा जयघोष करत कांदा,मुळा,भाजी अवघी विठाबाई माझी म्हणत पालखीत पायी चालत सामील झाले होते.



दि.२० जुलै रोजी पंढरपूरहून संत शिरोमणी सावता माळी यांच्या अरण (ता. माढा) येथील समाधीस्थळाकडे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही पांडुरंगाची पालखी प्रस्थान ठेवून तीन दिवसांच्या पायी प्रवास केल्यानंतर २६ जुलै रोजी अरण येथे पोहोचणार आहे. दरम्यान संत सावता माळी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त पारंपरिक भक्ती, श्रद्धा आणि सेवा यांचे प्रतीक असणारा हा अनोखा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडतो. या भक्तिसोहळ्यात माढा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार अभिजीत आबा पाटील यांनी स्वतः पायी दिंडीमध्ये रोप्ळे येथे पहिला मुक्काम असून आमदार पाटील यांनी पालखीचे स्वागत करत पायी चालत आले. याप्रसंगी बोलताना आ. अभिजीत आबा पाटील यांनी सांगितले की संत सावता माळी यांच्या जीवनमूल्यांचा वारसा आम्हा सर्वांच्या प्रेरणेसाठी आहे. लोकप्रतिनिधी म्हणून श्री पांडुरंग पालखीत उपस्थित राहणार असल्याचे सांगितले. अरण या संत भूमीत पांडुरंगाची पालखी येते ही आपल्या माढा तालुक्यासाठी गौरवाची गोष्ट आहे. पालखी सोहळ्याच्या माध्यमातून ग्रामीण भागात भक्तीचा व सांस्कृतिक वारसा वृद्धिंगत होत आहे. हा सोहळा अधिक व्यापक करण्यासाठी पुढील वर्षांमध्ये शासनस्तरावरून आवश्यक त्या योजना राबविण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. यावेळी वारकरी संप्रदायातील अनेक मान्यवर मंडळी, कीर्तनकार, स्थानिक भक्तगण, सावता परिषद पदाधिकारी, युवा कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिकविमा नाकारल्याने विमा कंपनी विरोधात न्यायालयात जाण्याचा इशारा

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२०, मुदखेड (नांदेड) :** केळी उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असतांनाही पिक विमा कंपन्यांनी विमा नाकारल्याने शिष्ट मंडळांनी निवासी जिल्हा अधिकाऱ्यांची भेट घेऊन नुकसानीचे पंचनामे अहवाल शासनाकडे पाठवून शेतकऱ्यांना भरपाई देण्याची मागणी करण्यात आली असून अन्यथा न्यायालयात जाण्याचा इशारा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक निलेश देशमुख बारडकर यांनी दिला आहे.

जून महिन्यात जिल्ह्यांत वादळी वारा व अवकाळी पावसामुळे केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या बागा भुई सपाट झाल्या होत्या. यामध्ये मुदखेड व अर्धापूर तालुक्यांतील केळीचे मोठे नुकसान झाले आहे. नैसर्गिक आपत्तीत जिल्ह्यांतील ३५ महसूल मंडळ बाधित झाली होती परंतु केवळ चार महसूल मंडळातील स्वयंचलित हवामान केंद्रावर ४० किलोमीटर प्रति तास अथवा त्यापेक्षा जास्त वेगाच्या वाऱ्यांची नोंद झाली आहे. जिल्ह्यांतील ३१ महसूल मंडळामध्ये हवामान धोक्याचा निकष ट्रिगर लागू झाला नसल्याचे कारण दाखवून भारतीय कृषी विमा



कंपनीने नुकसान भरपाईस नकार दिला आहे. कृषी, महसूल व ग्रामविकास विभागाच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या संयुक्त पंचनाम्यातील नुकसानाचे प्रमाण केळी संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी शिवाजी शिंदे यांच्या अहवाल लक्षात घेता केळी बागाचे नुकसान ४० किलोमीटर प्रतितासापेक्षा अधिक वेगाच्या वाऱ्यामुळे झाल्याचे स्पष्ट केले आहे. हवामान शास्त्रज्ञ कैलास डाखोरे , हवामान विभाग मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी यांनी सादर केलेल्या अहवालानुसार सध्या स्थितीत स्वयंचलित हवामान केंद्र वाऱ्यांच्या वेगाने नोंद घेणारे सेंसरनी केवळ दोन मी उंचीवरील वाऱ्यांची गती मोजली असल्याने तांत्रिक सूत्रानुसार स्वयंचलित हवामान केंद्रावर नोंद झालेल्या वाऱ्यांची पाच मीटर उंचीवर गती ४० किलोमीटर प्रतितास पेक्षा अधिक असल्याचे स्पष्ट होते. भारतीय कृषी विमा कंपनीने ट्रिगर ऐवजी पंचनामे व तांत्रिक अहवाल लक्षात घेऊन विमा धारक केळी उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता असल्याचे निलेश देशमुख यांनी स्पष्ट केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांची राज्यसभा खासदार अशोक चव्हाण आमदार श्रीजया चव्हाण यांनी भेट घेऊन केळी नुकसान भरपाई अहवाल संदर्भात सविस्तर चर्चा केली आहे. यापूर्वी श्रीजया चव्हाण यांनी केळी नुकसान संदर्भात तारांकित प्रश्न उपस्थित करून विधानसभेत लक्ष वेधले होते विमाधारक शेतकऱ्यांनी केळी नुकसानी संदर्भात वैयक्तिक तक्रारीची नोंद केली आहे विमा कंपनीने पंचनामा कारवाई करणे आवश्यक आहे. मात्र ट्रिगर चे कारण देत भारतीय कृषी विमा कंपनीने पंचनामा अहवालास नकार दिला आहे. शासनाने पिक विमा कंपन्यांना या संदर्भात सूचना देऊन केळी उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई विमा देण्यात यावा अन्यथा विमा कंपनीच्या विरोधात न्यायालयात जाण्याचा इशारा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक निलेश देशमुख बारडकर यांनी दिला आहे.

## घोडपेठ येथे ३३ के.व्ही विद्युत सबस्टेशन उभारण्याची मागणी : श्यामसुंदर उरकुडे

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, भद्रावती (चंद्रपूर) :** आमदार करण देवतळे यांच्या मार्गदर्शनात भद्रावती ग्रामीण तालुका प्रमुख श्याम सुंदर उरकुडे यांनी ऊर्जा राज्यमंत्री यांच्याकडे निवेदन देऊन भद्रावती तालुक्यातील घोडपेठ येथे ३३ के. व्ही. सबस्टेशन उभारण्याची मागणी केली. घोडपेठ हे भद्रावती तालुक्यातील शेतीप्रधान व व्यापारी दृष्टीने एक महत्वाचे केंद्र असून या परिसरात मोठ्या प्रमाणावर विजेची मागणी वाढत आहे. यामुळे वारंवार होणारे लो - होल्टेज, व लोडशेडींग ची समस्या लक्षात घेता या भागात स्वतंत्र ३३ के.व्ही. विद्युत सब स्टेशन उभारण्याची आवश्यकता



असल्याने भद्रावती ग्रामीण तालुका प्रमुख शामसुंदर उरकुडे यांनी मुंबई येथे आमदार करण देवतळे यांच्या मार्गदर्शनात ऊर्जा राज्य मंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्याकडे निवेदन देऊन केली. यावेळी उरकुडे यांनी विद्यमान वीज यंत्रणेची मर्यादा आणि वारंवार होणाऱ्या अडचणी यांचा पाढाच मंत्र्यासमोर वाचला. यामुळे परिसरातील घोटनिंबाळा, घोट, चालबर्डी, गुंजाळा, सायवन, गोरजा, कोंढाळी, लोणारा, चपराळा, कचराळा, कुडराळा, चिरादेवी, कोची, पिपरी, तेलवासा, ढोरवासा या गावांना दिलासा मिळणार असून त्यांची विजेची समस्या सुटणार आहे. निवेदन दिल्यावर ऊर्जा राज्यमंत्री यांनी या निवेदनाची गांभीर्याने दखल घेतली असून लवकरच तांत्रिक अभ्यास करून निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिले. यावेळी सुनिल नामोजवार भद्रावती शहर अध्यक्ष, दयानंद जांभुळे नंदोरी चंदनखेडा क्षेत्र मंडळ अध्यक्ष यांची उपस्थिती होती.




## गुंठेवारीचे पीक!

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बहुचर्चित तुकडाबंदी कायदा शिथिल करण्याची घोषणा करून राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा दिला. शहरी भाग आणि गावठाणापासून दोनशे मीटर अंतरावरील १ जानेवारी २०२५ पर्यंतचे जमिनीच्या छोट्या तुकड्यांचे व्यवहार त्यामुळे नियमित होतील. विधिमंडळाने कायदा दुरुस्तीची मोहोर उमटविल्यानंतर अगदी एक गुंठ्यापासून प्रलंबित असलेली गुंठेवारीची पन्नास लाख प्रकरणे मार्गी लागतील. विहीर, शेतरस्ता, मोजणीत अतिरिक्त भरणाऱ्या क्षेत्रांची अदलाबदल आदी कारणांबाबत या निर्णयाचा शेतकरीवर्गाला लाभ होईल, असे सांगितले जाते. प्रत्यक्षात मात्र राज्याच्या बऱ्याच भागांत दलाल, गुंतवणूकदारांसह तत्सम घटकांचे फावणार आहे.

शेतजमिनीचे लहान-लहान तुकडे होऊ नयेत, किफायतशीर शेतीत अडचण येऊ नये, हा तुकडाबंदीचा उद्देश. वारसाहक्क वा इतर कारणांमुळे जमिनीचे तुकडेकरण रोखण्यासाठी १९४७मध्ये हा कायदा आणला गेला. परंतु, त्यातील पळवाटा शोधून राज्यात छोट्या जमिनींचे व्यवहार होत राहिले. शासनानेही वेळोवेळी कायद्यात दुरुस्त्या करून अनधिकृत प्रकरणे अधिकृत ठरवली. महसूलपासून मंत्रालयापर्यंत दलाल-विकासकांची साखळी असल्याने हे घडले. शहरे व मोठ्या गावांलगतच्या शेतकऱ्यांना त्या-त्या वेळच्या निर्णयांचा काही प्रमाणात लाभ झाला. परंतु, कृषक जमिनीच्या तुकडेकरणाकडे सरकार दुर्लक्ष करीत गेले. तेथे उभ्या राहणाऱ्या अनधिकृत बांधकामांकडेही काणाडोळा केला गेला. शहरे आणि गावांमध्ये शेतजमिनींचे दर वाढत गेले तशी गुंठेवारीने अधिक उचल खाल्ली.

चार-पाच वर्षांपूर्वी जिरायतीसाठी वीस गुंठे, तर बागायतीसाठी दहा गुंठ्यांच्या खरेदी-विक्रीला सरकारने परवानगी दिली; परंतु तुकडाबंदी कायद्याचे आणखी बऱ्याचदा तुकडे होतील, याची गुंठेवारी लॉबीला पुरेपूर कल्पना असावी. त्यामुळे सुरुवातीला रेडीरेकनरच्या पाच टक्के, नंतर पंचवीस टक्के शुल्क आकारून अशा भूखंडांचे नियमितीकरण करण्याच्या मोहिमेला प्रतिसाद मिळाला नाही. आता तुकडाबंदी कायदाच रद्द होणार असल्याने शुल्क भरून बांधकामे नियमित करण्याचे नियम आपसूकच केराच्या टोपलीत जातील. मोठ्या लोकसंख्येची गावे, राज्य-महामार्गांलगतही तुकडेकरणाला परवानगी दिली जाऊ शकते. मोठ्या आर्थिक उलाढाली होत असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वीच हा विषयसुद्धा संपवला जाईल. सरकारच्या 'एसओपी' पंधरा दिवसांतच त्याचा निकाल लावू शकते. एक आणि दोन गुंठ्यांचे मालकी हक्क तयार होऊन वाढणाऱ्या गुंतागुंतीची मात्र कोणालाही फिकीर नाही.

नाशिक जिल्ह्यात नियमित होणारे भूखंड, दलालांनी आधीच ग्राहकांना अनधिकृतरीत्या विकलेले आहेत. एका गुंठ्यासाठी चार ते दहा-बारा लाख रुपयांपर्यंतची किंमत ग्राहकांनी मोजली. महागडे फ्लॅट वा अकृषक जागा घेणे शक्य नसल्याने गुंठेवारीने खरेदी करणाऱ्यांत परप्रांतीय बहुसंख्य आहेत. या छोट्या भूखंडांवर वसाहती निर्माण झाल्या आहेत. ही घरेसुद्धा आज-उद्या नियमित होतील, याची खात्री दलाल व गुंतवणूकदारांच्या 'तुकडे गँग'ला आहेच. सद्यस्थितीत या जागा मूळ शेतकऱ्यांच्याच नावे असल्याने व्यवहार शेतकरी ते ग्राहक असेच होतील. मलिदा मात्र मधली साखळी खाऊन जाईल. शेतकऱ्यांकडून जमीन विकत घेऊन, तिचे तुकडे करून, अवैध विक्री करून बक्कळ नफा कमावला जातो. गावागोवी आणि शहरांतही हेच रॅकेट सक्रिय आहे. दलाल, गुंतवणूकदार, स्थानिक पुढारी, लोकप्रतिनिधी आणि महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमतातून शेती संपवली जात आहे. या जागांवर बेसुमार बांधकामे होऊन शहराचा नियोजनबद्ध विकास मोडीत निघू शकतो. बकालपण वाढू शकते. या वसाहतींना रस्ते, पाणी, वीज अशा मूलभूत सुविधा पुरविण्याचे आव्हान स्थानिक स्वराज संस्थांसमोर उभे आहे. वास्तविक, गुंठेवारीचे धोरण सुस्पष्ट व दूरदृष्टीचे असावे. परवानगीचे निकष ठोस हवेत; अन्यथा 'पहिले पाढे पंचावन्न'प्रमाणे शेती संपून गुंठेवारीचे चक्र सुरूच राहील. शहरे सुजत राहतील, बेफाम अस्ताव्यस्त वाढत राहतील!

# निसर्गाची अवकृपा !

माणसांप्रमाणे निसर्ग देखील बदलला आहे असे वाक्य हल्ली सर्वांच्या तोंडी ऐकायला मिळते आणि ते खरेही आहे कारण सध्या निसर्गाच्या लहरीपणा वाढत चालला आहे निसर्गाचा लहरीपणाचा अभ्यास करणारे हवामान खातेही निसर्गापुढे हतबल ठरत आहे कारण हवामानासंबंधीचा अंदाज बांधणे त्यांनाही कठीण होत आहे. पुर्वी ज्याप्रमाणे हवामान होते तसे हवामान आता राहिले नाही. सध्या सतत हवामान बदलत असते.





निसर्गाचा लहरीपणा वाढला आहे. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या तीन ऋतूत जसे हवामान होते तसे आता राहिले नाही. जून ते सप्टेंबर हे चार महिने पावसाचे असतात मात्र गेल्या काही वर्षात आपल्या देशात वर्षभर पाऊस पडतो असे म्हटले तर वावगे ठरणार नाही कारण वर्षभर कोठेना कोठे अवकाळी पाऊस, गारा तसेच चक्रीवादळे होतच असतात. पावसाळाच नाही तर उन्हाळा आणि हिवाळ्याचीही तीच गत आहे. उन्हाळ्यात तर तापमान ४० अंशाच्या पुढे जाते पूर्वी उन्हाळ्यात सरासरी तापमान ३५ ते ३८ अंशाच्या दरम्यान असायचे ते आता ४० अंशावर गेले आहेत. अलीकडे ऋतुमान बदलत आहे कोणत्याच ऋतूची सुरवात वेळेवर होत नाही उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे तिन्ही ऋतू उशिराच सुरू होतात. आता हेच पहा ना जून मध्ये येणारा पाऊस जुलै संपत आला तरी दडी मारतो आणि आला तर असा येतो की दोन दिवसात दोन दिवसांची सरासरी भरून काढतो.

मात्र अशाप्रकारच्या पावसाची आपल्याला गरज नसते कारण या पावसाने आपले नुकसानच होते. निसर्गाच्या या अवकृपेचे संकट केवळ आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगावर आले आहे. अर्थात या बदलत्या हवामानाला आणि निसर्गाच्या लहरीपणास ग्लोबल वॉर्मिंगला जबाबदार धरले जात आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. ग्लोबल वॉर्मिंग म्हणजे पृथ्वीवरील तापमानात होणारी वाढ. जेंव्हा पृथ्वीवरील सरासरी तापमान वाढते तेंव्हा ग्लोबल वॉर्मिंगची समस्या उद्भवते. ग्लोबल वॉमिंगची समस्या दिवसेंदिवस वाढत जाईल असा इशारा जागतिक हवामान खात्याने दिला आहे त्यामुळे यापुढे हवामानात बदल हे होतच राहणार आणि त्यामुळे निसर्गाचा लहिरपणा देखील वाढणार आणि तीच चिंतेची बाब आहे.

अर्थात हवामानातील बदल आणि त्यामुळे होणारी निसर्गाची अवकृपा ही केवळ ग्लोबल वॉर्मिंगमुळे होत आहे असे म्हणणे म्हणजे स्वतःच्या चुकीवर पांघरून घालण्यासारखे आहे. निसर्गातील बदलाला जितके ग्लोबल वॉर्मिंग जबाबदार आहेत तितकेच आपण म्हणजे मानव देखील जबाबदार आहोत. मानवाने निसर्गात हस्तक्षेप केला जंगलतोड करून सिमेंटची जंगले उभारली. बेसुमार वृक्षतोड केली. औद्योगिकरणाच्या नावाखाली कार्बन उत्सर्जन केले. वाहतुकीच्या नावाखाली प्रदूषण वाढवले. निसर्गावर अतिक्रमण करून निसर्गावर अन्याय केला. नदी नाल्यांचा मार्ग बदलला. या सर्व कारणांमुळे पृथ्वीवरील हवामान बदलत आहे. सजीवांना विशेषतः मानवाला जगण्यासाठी प्राणवायूची गरज असते. मात्र मानवाच्या चुकांमुळे स्वार्थामुळे हवेत घातक रसायनांचे आणि प्रदूषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सतत होणाऱ्या जंगलतोडीमुळे जंगलाखालील एकूण क्षेत्र २० टक्क्यांपेक्षा खाली आले आहे त्याचा मोठा परिणाम हवामान बदलावर झाला आहे. हवामान बदलामुळे निसर्गाचा लहरीपणा वाढला आणि निसर्गाने आपल्यावर अवकृपा करण्यास सुरवात केली.

भारत हा कृषिप्रधान देश असून भारतातील ७० टक्के नागरिक शेती आणि त्याला पूरक असणारे व्यवसाय करतात. निसर्गाच्या लहिरपणाचा सर्वाधिक फटका हा शेतकऱ्यांना बसत आहे. बदलत्या हवामानमुळे कोरडा दुष्काळ, ओला दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्री वादळे अशा नैसर्गिक आपत्तींना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. यामुळे अनेकांनी शेती करणेच बंद केले आहे तरुण वर्गाने गाव सोडून थेट शहर गाठले आहे. परिणामी गावे ओसाड होत आहे तर शहरांची लोकसंख्या वाढत आहे.

हवामान बदलाचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर देखील होत आहे. हवामान बदलामुळे श्वसनाचे आणि इतरही आजार वाढत आहे. निसर्गाचा लहरीपणाचा परिणाम केवळ मानवावरच नाही तर पशु पक्षी आणि सजीवांवर देखील होत आहे एकूणच निसर्गाच्या लहरीपणाचा परिणाम संपूर्ण जीवसृष्टीवरच होत आहे. निसर्गाची जर अशीच अवकृपा राहिली तर त्याचा परिणाम केवळ आपल्यालाच नाही तर येणाऱ्या पिढीला देखील भोगावा लागेल म्हणून या बदलत्या हवामानाची आणि त्यामुळे होणाऱ्या निसर्गाच्या अवकृपेची मानवाने गंभीर दखल घ्यायला हवी. हवामान बदलामुळे होणारे गंभीर परिणाम लक्षात घेऊन मानवाने आतापासूनच सकारात्मक पावले उचलायला हवीत. निसर्गाच्या या अवकृपेच्या संकटाकडे जर मानवाने दुर्लक्ष केले तर भविष्यात त्याची मोठी किंमत केवळ आपल्यालाच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीला चुकवावी लागेल.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## मानवता जपूया...

माणूस मानवताहीन झाला
वाईट कुकर्म करू लागला
माणुसकीला काळीमा फासून
स्वतःचीच घेतो पाठ थोपटून

मानवता शिल्लक राहिली नावाला
माहित असेल सगळ्या गावाला
माणूस नाही दाखवत मानवता
एवढा माणूस निर्दयी झाला

माणसात प्रचंड स्वार्थ बोकाळला
स्वार्थापायी माणूस मानवता विसरला
रक्ताची नाते तटातट तोडू लागला
अन् परक्याला जवळ करू लागला

पूर्वीसारखा माणूस नाही राहिला
काळानुसार तोही बदलला
पूर्वीच्या माणसात मानवता होती
आताच्या माणसाची क्रूरनीती

माणूस माणसाला करत नाही मदत
हीच झालीय माणसाची आदत
स्वार्थासाठी भाऊ भावाचा वैरी
एकमेकांना करत आहेत हाणामारी

अपघातात सापडलेल्या माणसाला
धावत नाही कोणी त्याच्या मदतीला
सगळेच घेतात बघ्याची भूमिका
कोणीच होत नाही जिवलग सखा

संस्कार होत आहेत कलियुगात कमी
संस्कार द्यायला नाहीत माणसे जुनी
सगळा अमानुष माणसांचा बोलबाला
दिसत नाही कोणीच मानवतावाला
म्हणून मानवता जपा
हाच आहे माणसाचा वसा

**- बुध्दभूषण कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जि. लातूर**

# वारसा संस्कारांचा आणि माणुसकी जपण्याचा

आमच्या बालपणीचा काळ हा सुखाचा, आनंदाचा आणि संस्कार रुजवण्याचा होता.त्याकाळात आजच्या सारखी मनोरंजनाची अनेक साधने उपलब्ध नव्हती. गावात फार फार तर पाच सहा घरी टिव्ही आणि वीस पंचवीस जणांकडे रेडिओ होते. तेच सगळ्या गावकऱ्यांचे मनोरंजन करायचे. सुट्टीच्या दिवशी आम्ही सगळी पोरं सकाळ संध्याकाळ मैदानावर जमा होऊन मैदानी खेळ खेळायचो. खेळ खेळताना थोडीफार भांडणे होत असत पण ती भांडणे कधी आजच्या सारखी विकोपाला गेली नाहीत. कारण त्याकाळी आमच्यावर तसे संस्कार रूजवले जायचे. थोरामोठ्यांच्या वर्तनातून व संवादातून कळत नकळतपणे आमच्यावर संस्कार रूजत गेले आणि आम्ही घडत गेलो. चौथी वर्गात असताना एके दिवशी माझी आजी मला म्हणाली होती, तुझे मायबाप मोल मजुरी साठी मुंबईला गेलेत, लय उनाडक्या करू नकोस. शिक्षणावर ध्यान दे. लय शिक्षण शिक.मायबापाच्या कष्टाचं पांग फेड'. आजीचे हे शब्द आजही मला आठवतात. पावसाळ्यात आईवडील गावाकडे आले की वडील आमच्या शिक्षणाचा आढावा घ्यायचे. आमच्या गृहपाठाच्या वह्या पहायचे. तेव्हा वडील मला म्हणाले होते, 'तुझे अक्षर चांगले आहे.असेच एकाग्रतेने शिक्षण शिक मोठा माणूस हो.'वडिलांचा हा सल्ला माझ्यासाठी लाखमोलाचा होता. एकदा आई मला म्हणाली होती,

'परिस्थिती कितीही वाईट असली तरीही शिक्षणावर ध्यान दे.खूप खूप शिक. मोठा आपिसर हो'. आई वडिलांचा संदेश हृदयात कोरून ठेवला होता.

दहावी वर्गात असताना माझ्या सर्व शिक्षकांनी वेळोवेळी मार्गदर्शन करताना सांगितले,'शिक्षणात खंड पडू देऊ नकोस.उच्च शिक्षण शिक. उच्च शिक्षणाने व्यक्ती शोभून दिसतो.'आणि मी कॉलेजमध्ये असताना माझ्या बहिण भावांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करून अधिकारी होण्याचा सल्ला दिला होता. याचबरोबर या सगळ्यांनी संस्काराची शिदोरी मला दिली ती मी कायमस्वरूपी आजही जतन करून ठेवली आहे. माझ्या गावाचे भुमिपूत्र स्वातंत्र्यसैनिक कालिदासराव देशपांडे आणि आदर्श शिक्षक गणेशराव गुळवे यांनी पुस्तके वाचनाचा सल्ला दिला. त्यांचा हा सल्ला माझ्यासाठी लाखमोलाचा होता. लातूर येथील राजर्षी शाहू कॉलेजमध्ये बीएस्सी चे शिक्षण घेताना ग्रंथालयात जाऊन मी अनेक दर्जेदार पुस्तकांचे वाचन केले.शाहू कॉलेजचे ग्रंथालय अनेक पुस्तकांचे ज्ञान भांडार आहे. येथे वाचलेल्या पुस्तकांनी माझे जीवन बदलून टाकले. माणूस बनण्याची व माणुसकीला जीवापाड जपण्याची शिकवण पुस्तकांनी दिली.श्यामची आई, रमाई, तराळ-अंतराळ, एक होता कार्व्हर, तोत्तोचान या काही पुस्तकांनी संस्कारांचा खजिना मला भेट दिला. पुढे जालना येथील जेईएस कॉलेजमध्ये एमएस्सी चे आणि पुणे शहरातील टिळक शिक्षण कॉलेजमध्ये बीएड् चे शिक्षण मी पूर्ण केले.

केवळ शैक्षणिक गुणवत्तेच्या जोरावर सरकारी शाळेत माध्यमिक शिक्षकाची नोकरी मिळाली. आठवी, नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना गणित विषयाचे अध्यापन करणे माझा आवडता छंद झाला आहे. माझ्या शिक्षकांनी गणित विषयाचे जे ज्ञान ज्या पद्धतीने दिले त्या पद्धतीने मी माझ्या विद्यार्थ्यांना गणित विषयाचे अध्यापन करतो. ग्रामीण भागातील माझे दहावीचे काही विद्यार्थी दहावी बोर्ड परीक्षेत गणितात पैकीच्या पैकी गुण घेतात.ही लक्षणीय गोष्ट माझ्या साठी व आमच्या शाळेसाठी अभिमानाची गोष्ट आहे.उच्च शिक्षण शिकून मला मोठा अधिकारी होता आले नाही याची खंत वाटण्याचे काही कारण नाही. शिक्षकी पेशात विद्यार्थी घडविण्याचे भाग्य मला लाभले आहे.उच्च शिक्षण शिकून शिक्षकाची नोकरी करताना एक विलक्षण आनंद मला मिळत आहे.सोबतीला लेखन कलेत पारंगत होण्यासाठी प्रयत्न करत आहे. माझ्यावर लहानपणी झालेले संस्कार व मला मिळालेले ज्ञान मी माझ्या विद्यार्थ्यांना देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहे. मी माझ्या विद्यार्थ्यांना तळमळीने नेहमी सांगत असतो,' विद्यार्थ्यांनो खूप खूप शिका.मोठा अधिकारी व्हा. आईवडिलांच्या कष्टांचे पांग फेडा.मोठा माणूस व्हा, पण पहिले माणूस बना आणि माणुसकीला जपा.'

**- बबन दामोदर गुळवे**
**ता.अहमदपूर,जि.लातूर.**
**मो.९७३०९३९७३२.**

# खारघर येथे पनवेल मनपा मार्फत वृक्षारोपण

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२०, पनवेल :** महानगरपालिका उद्यान विभाग आणि इन्फिनिटी फाऊंडेशन तसेच विविध महाविद्यालये यांच्या संयुक्त विद्यमाने आज दिनांक २० जुलै २०२५ रोजी खारघर येथील सेक्टर २७ ते सेक्टर ३२ अंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले.

पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे आणि उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा आणि नागरिकांना मोफत वृक्ष



वाटपाचा कार्यक्रम पनवेल महानगरपालिका उद्यान विभागामार्फत सुरू आहे.

या कार्यक्रमा अंतर्गत सेक्टर २७ ते खारघर ३२ मध्ये रस्त्याच्या कडेला करंज, कदंब, कांचन, बहावा, आपटा अशा विविध १५० वृक्षांचे रोपण करण्यात आले. महापालिकेच्या उद्यान विभागाबरोबर इन्फिनिटी फाऊंडेशन, पिल्लई अभियांत्रिकी महाविद्यालय एनएसएस युनिट, रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय खारघर, केएलई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कळंबोली एनएसएस युनिट, सरस्वती अभियांत्रिकी महाविद्यालय खारघर एनएसएस युनिट, डीवाय पाटील एनएसएस युनिटचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## शेतकरी संकटात, सरकार 'रमी' त मग्न ! क्रांतिकारी शेतकरी संघटनेचा तीव्र निषेध



**अक्षराज : प्रतिनिधी**

**ल वाशीम :** राज्यभरात शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कर्जमाफीचा अभाव, बोगस बियाणे, खतांचा तुटवडा आणि शेतमालाला मिळणारा अपुरा भाव यामुळे खरीप हंगाम धोक्यात आला आहे. तरीही कृषीमंत्री माणिकराव यांनी ओसाड गावच्या पाटीलकीचे स्वप्न पाहत, कृषीखात्याला 'रमीचा डाव' बनवले असल्याचा आरोप क्रांतिकारी शेतकरी संघटनेचा शेतकरी नेते राम इढोळे यांनी केला आहे. यांनी सांगितले की, राज्य सरकारकडून रोज ७ शेतकऱ्यांच्या आत्महत्येकडे दुर्लक्ष होत आहे. ना कर्जमाफी, ना हमीभाव, ना बोगस बियाण्यांवर कारवाई तरीही कृषीमंत्री रम्यात गुंतलेत, शेतकऱ्याच्या आयुष्याचा खेळ मांडला जातोय. ते पुढे म्हणाले की, राज्यात खरीप पेरणीसाठी शेतकरी झगडत आहे, पावसाची लपंडाव सुरू आहे, पण सरकारकडे ना नियोजन आहे. ना संवेदनशीलता. खतांच्या टंचाईने शेतकऱ्यांचे डोळे पाणावले आहेत. क्रांतिकारी शेतकरी संघटनेने कृषीमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

## येरवडा जेल बाहेर गुलाल, रस्ता – जाम; सुटतो आरोपी, अडकतो नागरिक !



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, येरवडा (पुणे) :** येरवडा मध्यवर्ती कारागृहासमोर गुन्हेगार सुटताच त्याच्या स्वागतासाठी धावणाऱ्या टोळक्यांची गर्दी ही पुणे शहरासाठी नवी नाही. पण आता ही गर्दी केवळ बेकायदेशीर नव्हे तर धोकादायक बनली आहे. एखाद्या बॉलिवूड हिरोसारखा स्वागत केला जातो. जयघोष, गुलाल, मिरवणूक – आणि या सगळ्यामुळे सामान्य नागरिकांना तासनतास वाहतूक कोंडीत अडकून हाल सोसावे लागतात. रुग्णवाहिकांना वाट मिळत नाही, शाळकरी मुलं, कार्यालयात जाणारे नागरिक आणि वृद्ध रस्त्यावरच अडकून बसतात. त्यांचं कुणालाच सोयरसुतक नसतं. इतकंच नाही तर हे सगळं पोलिसांच्या डोळ्यासमोर घडतंय. जेलच्या मुख्य प्रवेशद्वारावर तैनात असलेले मध्यवर्ती कारागृहाचे पोलीसही फक्त उभे राहून पाहतात. कोणीही गर्दीकडे हात करून ओरडत नाही, काही रोखत नाही. इतकंच नव्हे तर प्रतिबंधक कारवाईसाठी जे पोलीस स्थानकातील कर्मचारी घटनास्थळी येतात. तेही उपस्थित असतात, सक्रिय नाही – फक्त बघ्यांची भूमिका घेत गर्दीला सामावून घेतात, एक शब्दही न बोलता निघून जातात. जे पोलीस तिथे असतात ते फक्त बघ्याची भूमिका घेतात, ना कोणी आडवतं, ना कोणी कारवाई करतं – ही कायद्यानं भरलेली व्यवस्था की गुन्हेगारीला परवानगी देणारी यंत्रणा, असा प्रश्न निर्माण होतो. यातून स्पष्टपणे दिसतं की याठिकाणी कायमस्वरूपी 'नो एन्ट्री झोन' घोषित करणे अत्यावश्यक आहे आणि प्रत्येक सुटकेवेळी पोलीस कर्मचारी अनिवार्यपणे तैनात असावेत. गर्दीत सीसीटीव्हीच्या साहाय्याने प्रत्येकावर लक्ष ठेवलं जावं आणि ओळख पटवून कठोर कारवाई झाली पाहिजे. हा फक्त एका आरोपीचा सुटका प्रसंग नाही, तर कायद्याच्या व्यवस्थेवरचा थट्टा आहे आणि जर प्रशासनाने आता तरी गंभीर पावलं उचलली नाहीत तर समाजात गुन्हेगारांना 'हिरो' समजण्याचा मानसिक रोग बळावेल.

## दोनशे निवृत्त शिक्षकांसह खा. लंकेंची दिल्लीत धडक



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, अहिल्यानगर :** शिक्षण क्षेत्रात आयुष्य घालवलेल्या आणि अनेक पिढ्या घडवलेल्या सेवानिवृत्त शिक्षकांच्या प्रलंबित मागण्या मार्गी लावण्यासाठी खासदार निलेश लंके यांनी २०० सेवानिवृत्त शिक्षकांना बरोबर घेत काल शनिवारी दिल्ली दौऱ्यावर रवाना झाले आहेत.

अहिल्यानगर शहरातील रेल्वे स्थानकावर खासदार लंके यांच्यासह निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी,सेवानिवृत्त शिक्षक द.मा. ठुबे, बन्सी उबाळे, ज्ञानदेव लंके, विनायक कोल्हे तालुकाध्यक्ष, तालुकाप्रमुख यांच्यासह सेवानिवृत्त शिक्षक बांधव उपस्थित होते.

या दौऱ्यात खासदार निलेश लंके यांच्या माध्यमातून सेवानिवृत्त शिक्षक पंतप्रधान नरेंद्र मोदी, अर्थमंत्री निर्मला सितारामन व शरद पवार यांची भेट निश्चित करण्यात आली आहे. तसेच सेवानिवृत्त शिक्षकांच्या पेन्शन, वेतन, विसंगती, वैद्यकीय सुविधांबाबतचे मुद्दे मांडले जाणार आहेत.

या दिल्ली यात्रेत प्रवास, निवास व भोजन यांची उत्तम व्यवस्था खासदार लंके यांच्या वतीने करण्यात आलेली आहे. तसेच दिल्लीमधील ऐतिहासिक, धार्मिक आणि प्रेक्षणीय स्थळांना भेट देण्याची संधी शिक्षकांना मिळणार आहे. विशेष म्हणजे बहुतांश शिक्षक दिल्लीला पहिल्यांदाच जाणार असल्यामुळे त्यांच्या आनंदाला पारावार उरलेला नाही.

**न्याय मागण्यांसाठी सदैव कार्यरत...**

अनेक पिढ्या घडविण्याचे काम शिक्षक करत असतात. त्यांचे प्रश्न सोडविणे ही सर्वांची सामाजिक जबाबदारी आहे. शिक्षक ही माझ्या जीवनाची मूलभूत प्रेरणा आहेत. माझे वडीलही शिक्षक होते. त्यांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी मी सदैव कार्यरत असल्याचे खासदार लंके म्हणाले. सेवानिवृत्त शिक्षकांसाठी हे अविस्मरणीय क्षण असून, बहुतांश शिक्षक पहिल्यांदाच दिल्लीला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

# महाबळेश्वरच्या पावसाने केले शतक पूर्ण...



**अक्षराज : रियाज मुजावर**

**अक्षराज : महाबळेश्वर (सातारा) :** थंड हवेचे लोकप्रिय ठिकाण हिरवाईने नटलेल पर्यटन स्थळ असा नावलौकीक असलेले पावसाचे माहेर घर महाबळेश्वर यंदा मे महिन्यापासूनच येथे पावसाला सुरुवात झाली असून आता सुद्धा पावसाची धुवादार बॅटिंग सुरूच आहे. महाबळेश्वर येथील पावसाने या हंगामातील १०० इंचाचा टप्पा पार केला आहे. आजपर्यंत १००.५८३ इंच(२५५४.८० मी.मी) पावसाची नोंद झाली. महाबळेश्वरची जीवनवाहिनी असलेला वेण्णा लेक भरून वहात असून महाबळेश्वरचा आस पासचा परिसर हिरवागार व नयनरम्य झाला आहे.

पावसाळी हंगामा मध्ये महाबळेश्वर हे पर्यटकांचे प्रथम पसंतीचे पर्यटन स्थळ असल्याने निसर्गरम्य पर्यटन स्थळी पर्यटक मोठ्या प्रमाणात गर्दी करत आहेत.

महाबळेश्वर मध्ये हलका व मध्यम पाऊस पडत आहे. तसेच वातावरणात गारवा वाढला आहे. हिरव्यागार वनशीने नटलेल्या महाबळेश्वरचे रूप पूर्णपणे पालटले आहे. डोंगर दऱ्यातून उंचावरून वाहणारे धबधबे, दाट धुक्याची चादर पसरल्याने निसर्गाचे मनमोहक दृश्य पर्यटकांना पहावयास मिळत आहे. ठिकठिकाणी पावसात भिजण्याचा मनमुराद आनंद पर्यटक घेत आहेत.

वेण्णा लेक परिसर दाट धुक्यात हरवला आहे. पावसासह दाट धुक्यात पर्यटक फिरण्याचा आनंद लुटत आहे. वेण्णा लेक येथे पर्यटक बोटिंग करण्यासाठी गर्दी करत आहेत. बोटिंग सह घोडे सवारी करत आहेत. तसेच मकई व मकई पॅटीसचा अस्वाद घेताना दिसत आहेत.

महाबळेश्वर मधील प्रसिद्ध असणारा धबधबा लिंगमळा धबधबा म्हणजे पर्यटकांना पावसाळ्यात पर्वणीच ठरला आहे. लिंगमळा धबधबा व नयनरम्य निसर्ग पाहण्यासाठी तसेच मेटगुताड येथील मिनी भुशी डॅम येथे पर्यटक मोठ्या प्रमाणात गर्दी करत असून निसर्गाचा आनंद घेताना दिसत आहेत. प्रतापगडकडे जाताना आंबेनळी घाटात ठीक ठिकाणी उंचावरून कोसळणाऱ्या लहान मोठ्या धबधब्यावर देखील पर्यटक पहावयास मिळत आहेत. येथील बाजारपेठे मध्ये चने, शेंगदाणे, जाम, जेली, चिक्की, स्वेटर ,जॅकेट तसेच गरम कपडे खरेदी करण्यासाठी तसेच विविध पॉईंटवर पर्यटक अपल्या मित्र परिवारासह पावसाचा व हिरव्यागार निसर्गाचा आनंद घेताना दिसत आहेत.

## रायगडवाडी नामकरणाबद्दल पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा सन्मान

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.२०, सोलापूर :** हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेल्या दुर्गराज किल्ले श्री रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या छत्र निजामपूर या गावाचे नामकरण रायगडवाडी करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल ग्रामविकास मंत्री आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा आमदार देवेंद्र कोठे व शिवभक्त गुरुशांत धुत्तरगांवकर यांनी शनिवारी सन्मान केला. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांनी दुर्गराज किल्ले श्री रायगडाला राजधानी बनविले. बऱ्याच काळापासून दुर्गराज किल्ले श्री रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या रायगडवाडीचे नाव बदलून छत्र निजामपूर असे करण्यात आले होते. हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेला दुर्गराज किल्ले श्री रायगड आणि हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांची समाधी ज्या ग्रामपंचायत हद्दीत आहेत त्या ग्रामपंचायतीला छत्र निजामपूर असे नाव देण्यात आले होते. देशाच्या शत्रूंच्या नावाने असलेल्या गावांना पुन्हा एकदा मूळ नाव मिळावे अशी देशभरातील शिवभक्तांची गेल्या अनेक दशकांपासून मागणी होती. याबाबत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी छत्र निजामपूरचे नामकरण रायगडवाडी करण्याचा निर्णय जाहीर केला. त्याबद्दल आमदार देवेंद्र कोठे आणि मित्र परिवारातर्फे शनिवारी ग्रामविकास मंत्री आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच आषाढी वारीच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे विशेष आभार आमदार देवेंद्र कोठे यांनी याप्रसंगी मानले.



याप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगांवकर, पवन खांडेकर, सागर भोसले, आकाश भोसले, अभिषेक चिंता, अंबादास सकिनाल, धनराज दुडम आदी उपस्थित होते.

# कृषी मंत्रालयात केळी विम्यावर बैठक !

## संदीपकुमार देशमुख यांच्या तक्रारीची घेतली दखल...

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१९, मुदखेड (नांदेड) :** नांदेड जिल्ह्यात ९ व १० जून रोजी झालेल्या तडाकेबंद पाऊस आणि वादळी वाऱ्यामूळे मुदखेड व अर्धापूर तालुक्यांत केळीसहित इतर फळबागा जमीनदोस्त झाल्या. परंतु विमा कंपनीने याच नुकसानग्रस्त भागातील केळीचा पिक विमा नाकारल्याने बारड येथील प्रा. संदीपकुमार देशमुख यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्याशी संपर्क साधल्याने विस्तृत चर्चाअंती दखल घेतली असून कृषी मंत्रालय अलर्ट मोडवर आल्याने मंत्रालयात पुढील आठवड्यात 'उच्चस्तरीय बैठक' आयोजित करण्यात आली आहे.

मृग नक्षत्राच्या सुरुवातीलाच वादळी वाऱ्यामुळे मुदखेड व अर्धापूर या भागातील केळी व इतर फळबागांचे मोठे नुकसान झाले होते. त्यानंतर लागलीच खा. रवींद्र चव्हाण, खा. अशोक चव्हाण व नंतरच्या टप्यात जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी दौरा करून नुकसानीचा आढावा घेतला. या नुकसानी विषयी आ. श्रीजया चव्हाण यांनी विधिमंडळात प्रश्न उपस्थित केला. परंतु संबंधित विमा कंपनीने केलेल्या चलाखीची बाब बारड भागातील काँग्रेसचे कार्यकर्ते संदीपकुमार देशमुख यांनी थेट कृषी मंत्र्यांकडे मांडली. लागलीच कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याशी चर्चा करून सर्व माहिती घेतली. या विषयांवर ते पुढील आठवड्यात सर्व संबंधितांची बैठक घेणार आहेत.



मुदखेड, अर्धापूर, व भोकर, हदगाव तालुक्यांत ताशी ६० ते ९० वेगाने वादळी वाऱ्याने केवळ केळीच्या बागाच जमीनदोस्त झाल्या नसून शेतकऱ्यांचे स्वप्नही जमीनदोस्त झाले आहे. केळी व सर्वच फळबागांची उंची १५ ते ३० फूट असते. केवळ ६ फुटाच्या वाऱ्यांचा वेग लक्षात घेऊन पीकविमा नाकारणे ही सर्व मिलीभगत असून बहुतांशी स्वयंचलित हवामान केंद्र चुकीच्या ठिकाणीही बसविण्यात आले आहेत. या सर्व केंद्राची उच्चस्तरीय तपासणी करून संबंधितावर गुन्हे दाखल करण्यात यावेत.

**प्रा. संदीपकुमार देशमुख बारडकर**

अर्धापूर मुदखेड या तालुक्यांमधील केळीच्या बागा जमीनदोस्त होऊन देखील संबंधित विमा कंपनीने केवळ निवघा, पिंपरखेड, तळणी (ता. हदगाव) दिग्रस – शेवडी (ता कंधार –लोहा) आणि चांडोळा ता मुखेड या मंडळांमध्ये झालेले नुकसान मान्य केले. ९–१० जून रोजी मुदखेड व अर्धापूर तालुक्यांत केळी बागा जमीनदोस्त झाल्या असता लगतच्या हदगाव तालुक्याच्या वेगवेगळ्या भागांमध्ये वाऱ्यांच्या वेगाची ताशी ६०–८० कि.मी. अशी नोंद झाली. परंतु अवघ्या दोन ते तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या अर्धापूर तालुक्यांतील चेनापुर येथे वाऱ्याचा ताशी वेग ३८ कि.मी. नोंदला गेला. अशाच प्रकारे मुदखेड व अर्धापूर तालुक्यांतील इतर मंडळातही वाऱ्यांचा ताशी वेग आश्चर्यकारकरीत्या कमी नोंदवला गेल्याने केळी उत्पादक शेतकऱ्यांनी स्वयंचलित हवामान केंद्राच्या तांत्रिक बाबीवर बोट ठेवले आहे. या दोन्ही तालुक्यांत सन २०२० मध्ये एका उच्चस्तरीय समितीकडून विविध मंडळातील स्वयंचलित हवामान केंद्रांची तपासणी केली असता अनेक केंद्रात त्रुट्या आढळून आल्या होत्या.

या प्रकरणात बारड येथील काँग्रेसचे कार्यकर्ते व केळी विषयावर संशोधन करणारे प्रा. संदीपकुमार देशमुख यांनी १४ जून रोजीच जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांना एक सविस्तर निवेदन दिले होते. यावेळी त्यांनी अर्धापूर – मुदखेड भागांतील हवामान केंद्रांतील दोष पालकमंत्री सावे यांच्या निदर्शनास आणून दिला होता. स्थानिक पातळीवरील सर्व संबंधितांकडे तक्रार करूनही केळी बागायतदारांना नुकसान भरपाई तर मिळालीच नाही; परंतू आता पिक विमाही नाकारल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. या पार्श्वभूमीवर आता सर्वांचे लक्ष कृषिमंत्र्यांकडे होणाऱ्या बैठकीकडे लागले आहे.

## अरुण रोडे यांच्यावर अज्ञात व्यक्तींचा हल्ला ; वाहन अडवून लाकडी दांडक्याने मारहाण

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, अहिल्यानगर :** अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांचे वाहन अडवून दहा ते बारा अज्ञात व्यक्तींनी लाकडी दांडक्याने मारहाण केल्याप्रकरणी सदर अज्ञात व्यक्तींवर नगर तालुका पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटना गुरुवारी (दि.१७ जुलै रोजी) नगर कल्याण रोड येथे घडली. अरुण रोडे (रा. धोत्रे बुद्रुक, ता. पारनेर) गुरुवारी (दि.१७ जुलै रोजी) जिल्हा



पोलीस अधीक्षक कार्यालय येथे पारनेर तालुक्यातील वनकुटा येथे होत असलेल्या अवैध गौण खनिज उत्खनन बाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपोषणाचे पत्र देण्यासाठी आले होते.

त्यानंतर तहसील कार्यालय येथे पत्र देऊन दुपारी ४:१५ मिनिटांनी आपल्या चार चाकी वाहनाने घरी चालले असताना कल्याण रोड अमरज्योत हॉटेल ते नेप्ती फाट्याच्या दरम्यान एक मुलगा स्कुटीवर येऊन गाडीला कट मारल्याचे कारण सांगून हुज्जत घालण्यास सुरुवात केली. त्यानंतर १८ ते २४ वयो वर्षाचे अनोळखी दहा ते बारा युवक मोटरसायकलीवर आले व गचंडी धरून रोडच्या बाजूला घेऊन लाकडी दांडक्याने मारहाण करण्यास सुरुवात केली.

यावेळी रिक्षावाल्यांनी त्यातून सोडविले व तेथून पळालो व नंतर हल्लेखोर युवक तेथून निघून गेल्याचे रोडे यांनी फिर्यादीत म्हंटले आहे.

जिल्हा रुग्णालय येथे उपचार घेऊन व नंतर पोलीस स्टेशनला जाऊन दिलेल्या फिर्यादीवरुन शुक्रवारी १८ जुलै रोजी दहा ते बारा अज्ञात व्यक्तींवर सदर प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ठाण्यात उपमुख्यमंत्री निरोगी महिला अभियानाचा शुभारंभ

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२०, ठाणे :** उपमुख्यमंत्री निरोगी महिला अभियानातंर्गत महिलांची गर्भाशय कर्करोग तपासणी जलदगतीने व्हावी यासाठी नगरविकास विभागाकडून ठाणे महापालिकेच्या आरोग्य विभागास पाच कोटींचा निधी देण्यात येईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिनांक २० जुलै २०२५ रोजी ठाण्यात केली. ठाणे महानगरपालिका, रोटरी क्लब आणि आदित्य बिरला कॅपिटल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'उपमुख्यमंत्री निरोगी महिला' अभियानाचा आज ठाण्यातील लोकमान्य नगर मधील कोरस आरोग्य केंद्रात शुभारंभ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.




यावेळी ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, उपायुक्त उमेश बिरारी, डॉ.प्रसाद पाटील, डॉ. कारखानीस, आदित्य बिर्ला फाउंडेशनचे पदाधिकारी तसेच रोटरी क्लबचे महाजन आणि त्यांचे सर्व सहकारी उपस्थित होते.

गर्भाशयाचा कर्करोग हा जगातील दुसरा सर्वसाधारण आढळणारा आजार असून त्यांचे निदान लवकर झाले तरच त्यावर उपाय करणे शक्य होते. आपल्या कुटुंबातील महिला भगिनी या कायम कुटुंबाकडे लक्ष देताना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे या शिबिराकडे दुर्लक्ष न करता जास्तीत जास्त महिलांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी याप्रसंगी केले.

दरम्यान लाडक्या बहिणींसाठी हे अभियान सुरू करण्यात आले असून, पुढील तीन महिन्यांत पाच लाख महिलांची विनामूल्य वैद्यकीय तपासणी या अभियानाच्या माध्यमातून करण्यात येईल, असे यावेळी जाहीर केले. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे गर्भाशय मुखाचा कर्करोग, ९ ते १४ वयोगटातील मुलींसाठी एचपीव्ही लस, मधुमेह तसेच हिमोग्लोबिन तपासणी तसेच स्त्रियांच्या निरोगी आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत संवाद याचा अंतर्भाव या शिबीरात करण्यात येणार आहे.

यासाठी इथे सोनोग्राफीची अद्ययावत मशीन, मॅमोग्राफीची गाडी सज्ज ठेवण्यात आली आहे. त्या माध्यमातून नामवंत डॉक्टरांची मदत घेऊन हे अभियान राबविण्यात येईल असे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.प्रसाद पाटील यांनी सांगितले.

---

# आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ताकतीनिशी लढवणार : मनसे नेते धोत्रे

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२०, पंढरपूर :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांच्या प्रमुख उपस्थित रविवार, दिनांक २० जुलै २०२५ रोजी मंगळवेढा येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे पार पडली.



यावेळी मंगळवेढा तालुक्यातील विविध पक्षातील कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या उपस्थितीत प्रवेश केला. यावेळी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी सांगितले की येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये मोठ्या ताकतीने राजसाहेब ठाकरे यांचा नेतृत्वाखाली सामोरे जाणार असून गाव तिथे शाखा घर तिथे कार्यकर्ता हे अभियान राबवण्यात येत आहे. विविध पक्षातील लोक मनसेमध्ये प्रवेश करत आहेत. कायम मनसेचे कार्यालय विविध प्रश्न घेऊन येणाऱ्या नागरिकांनी भरलेले असते नागरिकांचा विश्वास कायम मनसेच्या सोबत असल्यामुळे येणार काळात या मतदारसंघातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मनसेला यश मिळेल असा विश्वास व्यक्त करत निवडणुकीसाठी मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी पूर्ण ताकतीनिशी कामाला लागावे. पक्ष कायम पाठीशी राहिल असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी त्यांनी मनसेमध्ये अनेक पक्षाचे नेतेमंडळी पक्ष प्रवेश करत असल्याने आगामी काळात निष्ठावंत महाराष्ट्र सैनिक आणि नवीन लोकांचा मेळ घालून काम करण्याच्या सूचना पदाधिकाऱ्यांना दिल्या.यावेळी व्यासपीठावर मनसेचे जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे, समन्वयक नारायण गोवे, उपजिल्हाध्यक्ष चंद्रकांत पवार, पंढरपूर तालुकाध्यक्ष शशिकांत पाटील, नूतन मंगळवेढा तालुका अध्यक्ष धनाजी गडदे,सांगोला तालुकाध्यक्ष अनिल केदार, विधानसभा अध्यक्ष अनिल बागल, शहराध्यक्ष संतोष कवडे, संघटक गणेश पिंपळनेरकर, विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष अवधूत गडकरी व उप शहराध्यक्ष प्रदीप परचंडे,उप तालुकाअध्यक्ष कृष्णा ताड इत्यादी उपस्थित होते.

---

# अमृत आणि एम.सी.ई.डी.मार्फत मोफत प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, पालघर :** महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अचठणढ), पुणे आणि उद्योग संचालनालय - महाराष्ट्र शासन अंतर्गत कार्यरत महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (चउए) पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने अमृत लक्षीत गटातील उमेदवारांसाठी विविध निःशुल्क प्रशिक्षण जिल्ह्यात विविध ठिकाणी नियोजित करण्यात आले आहेत.

याविषयी सविस्तर माहिती देताना श्री.धम्मपाल थोरात प्रकल्प, अधिकारी एम.सी.ई.डी.पालघर यांनी सांगितले की, अमृत लक्षित गटातील युवक आणि युवतींसाठी अमृत –सूर्यमित्र (सौर), अमृत–बेकरी, अमृत–आयात निर्यात आणि अमृत –निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण (ठएझ) असे चार प्रकारचे प्रशिक्षण १८ दिवस निवासी होणार आहेत. त्याचबरोबर अमृत–उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (२१ दिवस), अमृत तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (३० दिवस) आणि अमृत क्षमता बांधणी प्रशिक्षण कार्यक्रम (०६ दिवस) हे तीन प्रकारचे प्रशिक्षण अनिवासी स्वरूपात होणार आहेत.

सदरील ट्रेनिंगमध्ये जे तांत्रिक प्रशिक्षण आहेत त्या संबंधित ट्रेडचे संपूर्ण प्रात्यक्षिक होणार असून सर्व ट्रेनिंगमध्ये उद्योजकीय मार्गदर्शन, व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक, व्यवस्थापकीय आणि कायदेशीर माहिती, मार्केटिंग कौशल्य: ग्राहकांशी संबंध तयार करून बाजारात व्यवसाय वाढवण्याचे तंत्र शासनाच्या विविध योजना, बँकिंग प्रकल्प अहवाल, उद्योगात लागणारे कागदपत्रे, उद्योजकीय मानसिकता, उद्योजकीय गुणसंपदा ई. विषयावर तज्ज्ञांमार्फत मार्गदर्शन होणार आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर व्यवसाय उभारणीसाठी एम.सी.ई.डी.मार्फत पाठपुरावा केला जाणार असून प्रशिक्षणानंतरही प्रशिक्षनार्थिना मोफत मार्गदर्शन मिळणार आहे.

अमृत लक्षित गटातील किमान ८ वी पास, कोणत्याही शासकीय कागदपत्रावर जातीचा उल्लेख, तहसीलदार याचे रहिवाशी दाखला आणि उत्पन्न दाखला ई. असणारे सर्व इच्छुक अमृत लक्षित गटातील इच्छुक यासाठी अर्ज करू शकतात. यासाठी एम.सी.ई.डी. द्वार जिल्हा उद्योग केंद्र, १०३, प्रशासकीय इमारत अ, जिल्हाधिकारी कार्यालय पालघर येथे निवड प्रक्रिया सुरू आहे. अमृत लक्षित गटातील पात्र लाभार्थींची मुलाखतीद्वारे निवड होणार असून इच्छुकांनी २८ जुलै २०२५ पर्यंत श्री. धम्मपाल थोरात प्रकल्प अधिकारी एम. सी. ई.डी पालघर मो. ९१६८६६७१६३ किंवा शशांक कुंभारे अमृत जिल्हा व्यवस्थापक पालघर मो. ९८३३९९२८४३ यांच्याशी संपर्क साधून या निःशुल्क प्रशिक्षण कार्यक्रमाचा जास्तीत जास्त युवक, युवती आणि उद्योजक तथा नवउद्योजक यांनी लाभ घ्यावा असे आवाहन दत्तात्रय थावरे, विभागीय अधिकारी एम.सी.ई.डी. मुंबई/कोंकण विभाग यांनी केले आहे.

---

# पंढरपूर कॉरिडॉर अंतर्गत नागरिकांशी चर्चा करण्यासाठी 3 उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२०, पंढरपूर :** पंढरपूर कॉरिडॉर विकासाच्या संदर्भात स्थानिक नागरिकांच्या समस्या आणि अपेक्षा समजून घेण्यासाठी तसेच शासनाकडून कशा पद्धतीने मदत केली जाणार आहे याची माहिती देण्यासाठी दिनांक २५ जुलै ते ५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत बैठका आयोजित केल्या जात आहेत. या बैठका घेण्यासाठी तीन उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली असून सर्व समावेशक चर्चा होण्यासाठी नागरिकांनी सहभागी होऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.



भूसंपादन अधिकारी संतोष देशमुख, भूसंपादन अधिकारी सीमा होळकर व जिल्हा पुनर्वसन अधिकारी सुशांत बनसोडे या तीन उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती पंढरपूर कॉरिडॉर अनुषंगाने संबंधित नागरिकांशी सर्व समावेशक चर्चा करून नागरिकांच्या मागण्या सूचना व अपेक्षा यांची माहिती जाणून घेणार आहे. तसेच शासन त्यांना या अंतर्गत कशा पद्धतीने मदत करू शकते याविषयी सांगितले जाणार आहे. संबंधित अधिकारी दररोज २५ ते ३० नागरिकांच्या गटाशी चर्चा करतील. तरी पंढरपूर कॉरिडॉर अंतर्गत ज्या नागरिक, व्यापारी व व्यावसयिक यांचा संबंध येणार आहे अशा सर्व नागरिकांनी अशा बैठकामध्ये उपस्थित राहून सहकार्य करावे. नियुक्त केलेले अधिकारी हे उपरोक्त कालावधीत पंढरपूर येथे थांबून कामकाज करतील.

> पंढरपूर कॉरिडॉरच्या अनुषंगाने दिनांक १ ते ३ मे २०२५ या कालावधीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पंढरपूर येथे सर्व संबंधित नागरिकांच्या बैठका घेऊन चर्चा केलेली होती व त्या चर्चेमध्ये या अनुषंगाने पुढे जाण्यासाठी सर्वांना विचारात घेऊनच जाऊ असा शब्द प्रशासनाच्या वतीने देण्यात आलेला होता. त्या पार्श्वभूमीवर दिनांक २५ जुलै ते ५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत नियुक्त केलेले तीन उपजिल्हाधिकारी २५ ते ३० नागरिकांच्या गटाशी चर्चा करणार आहेत. या चर्चेतून सर्वसमावेशक निर्णय घेण्यात येणार आहे. तरी उपरोक्त कालावधीत सर्व संबंधित नागरिकांनी बैठकामध्ये सहभाग घ्यावा असे आवाहन करतो.
>
> **– कुमार आशीर्वाद जिल्हाधिकारी, सोलापूर**

---

# थोडक्यात

## भाषा वादावरून मुंबई लोकलमध्ये मराठी रणरागिनीचा रुद्रावतार

**अक्षराज : संजय पंडित**



**दि.१९, मुंबई :** मुंबई लोकलमध्ये कधी कोणत्या विषयावरून वाद होईल हे कधीच सांगता येत नाही. सध्या राज्यात मराठी आणि हिंदी भाषावादावरुन वातावरण तापलेले आहे. मराठी भाषा मुद्द्यावरुन राजकारण देखील तापलं आहे. आता हाच वाद मुंबई लोकलमध्येही दिसून आला आहे.काही दिवसांपूर्वी दोन महिलांमध्ये रक्तबंबाळ होईपर्यंत भांडणं झाली होती. तर, आता लोकलमध्ये सीटवरून वाद झाल्याचे पाहायला मिळतंय. लोकल सीटवरुन झालेला वाद थेट मराठी भाषेपर्यंत पोहोचला आहे. महिलांच्या डब्यात झालेल्या भांडणांचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे.व्हायरल झालेल्या या व्हिडिओत, मुंबई लोकलच्या महिलांच्या डब्यात वादावादी सुरू झाली. यात एक महिला प्रवासी दुसऱ्या महिला प्रवाशाला हा आमचा महाराष्ट्र आहे, मराठी येत नसेल तर बाहेर निघ, असे बोलताना दिसत आहे. मात्र हा वाद नेमका कशामुळं सुरू झाला याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, जागेवरुन दोन महिलांमध्ये वाद झाला मात्र पुढे तो वाद इतका ताणला की डब्यातील इतर महिलांनाही मध्यस्थी करावी लागली. त्यानंतर थेट भाषेपर्यंत हा वाद पोहोचला. वाद इतका वाढला की लोकलमध्ये महिलांचे दोन गट तयार झाले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे. काही जणांच्या मते, ही घटना मध्य रेल्वेच्या लोकलमध्ये घडली आहे. मात्र अद्याप याबाबत काहीच ठोस माहिती समोर आलेली नाही. महिला डब्यांत जागेवरुन हा वाद सुरू झाला होता. यात काही महिला बोलताना दिसत आहेत की, आमच्या महाराष्ट्रात राहायचं असेल तर मराठीत बोल नाहीतर चालू पडा. त्यानंतर महिला डब्यातील प्रवाशांमध्ये दोन गट पडल्याचे दिसत आहेत.

## सुभाष नगर येथे स्वातंत्र्यानंतर प्रथमच धावली लालपरी

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**



**दि.२०, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील सुभाषनगर येथील विद्यार्थी शिक्षणासाठी गावापासून साधारण ५ कि.मी. दूर असलेल्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय विंचूर येथे पायी पायपीट करत होते. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांची समस्या दूर करण्यासाठी विद्यालयाकडून सर्वतोपरी प्रयत्न केले गेले. त्याचे फलित म्हणून लासलगाव एसटी डेपोच्या व्यवस्थापिका काळे मॅडम यांच्या सहकार्यातून स्वातंत्र्यानंतर प्रथमच सुभाषनगर येथे एसटी महामंडळाने बस फेरी सुरू केली. त्यामुळे विद्यार्थ्यांची पायपीट आता थांबणार आहे. त्याप्रसंगी सुभाषनगर गावाचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विद्यालयाचे प्राचार्य, विविध पदाधिकारी, ग्रामस्थ व विद्यार्थी बसच्या स्वागतासाठी उपस्थित होते. बस फेरी सुरू झाल्यामुळे रयत शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती, शाळा व्यवस्थापन व विकास समिती, पालक शिक्षक संघ, माता पालक संघाचे सर्व कार्यकारिणी सदस्य, ग्रामस्थ, प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी महामंडळाचे आभार व्यक्त केले.

## दिवा ते सीएसटी लोकल तात्काळ चालू करावी मागणीसाठी समाजसेवक अमोल केंद्रे यांचा धडक मोर्चा

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२०, दिवा (ठाणे) :** दिनांक २० जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता ग्लोबल हायस्कूल येथून मोर्चाला सुरुवात झाली. रेल्वे स्टेशन येथे मोर्चा समाप्त झाले. ४ तास हे आंदोलन चालले. दिव्यातील नागरिकांनी या आंदोलनाला चांगला प्रतिसाद दिला. दिवा ते सी.एस.टी.एम (उडढच्) रेल्वे सुरू व्हावी, लोकल तात्काळ चालू करावी. यादी मागणीसाठी समाजसेवक अमोल केंद्रे यांनी धडक मोर्चा काढला. दिवा जंक्शन असल्याने सर्व फास्ट लोकल दिवा येथे थांबण्यासाठी यासाठी गेले अनेक वर्षापासून निवेदन, स्वाक्षरी मोहीम, मोर्चा, आमरण उपोषण करून ही न्याय न मिळाल्याने गेल्या २० दिवसापून समाजसेविका अश्विनी अमोल केंद्रे धरणे आंदोलन करत असून रेल्वे प्रशासनाने कोणतीही दखल न घेतल्याने दिवा शहरातील जनतेच्या वतीने एल्गार मोर्चा काढण्यात आला.

रेल्वे प्रशासनाचा निषेध म्हणून प्रतिकृती बनवून रेल्वे प्रशासनाला तुडवण्यात आले. मंगळवार, दिनांक २२ जुलै २०२५ रोजी पर्यंत दखल न घेतल्यास रेल रोको करणार आहेत. हे सर्व रेल्वे प्रशासनाच्या दिरंगाई मुळे होत आहे. २० दिवस झाले महाराष्ट्रातील एक मराठी महिला अश्विनी अमोल केंद्रे लढत असताना राजकीय पक्ष स्थानिक लोकप्रतिनिधी, रेल्वे प्रशासन का दखल घेत नाही. जर २ प्लेट फॉर्म असताना विद्याविहार स्टेशन वरून तर ४ प्लेट फॉर्म असताना घाटकोपर वरून स्पेशल लोकल सोडली जाऊ शकते तर दिवा हे जंक्शन असूनही ८ प्लेट फॉर्म असताना लोकल का चालू होत नाही. रेल्वे प्रशासन आणखी किती जीव जाण्याची वाट पाहत आहे. त्यामुळे रेल रोको आंदोलन करावे लागेल. रेल रोको आंदोलन रेल्वे प्रशासनाच्या मुळे करण्यात येत असून रेल्वेची किंवा इतर काही जीवितहानी झाली, नुकसान झाले, तर त्याची जब्बदारी रेल्वे प्रशासनाची असल्याचे अमोल धनराज केंद्रे यांनी सांगितले.

वंचित बहुजन आघाडी पक्षाच्या वतीने पाठिंबा देऊन विकास इंगळे हे ४ दिवस झाले आमरण उपोषणास बसले आहेत. आता तरी प्रशासन जागे होणार का आणि या मोर्चाची दखल घेणार का...?

---

# स्वच्छता मोहीमांसह स्वच्छताकर्मींकरिता व्यसनमुक्ती व योग शिबिराचे आयोजन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२०, नवी मुंबई :** ०१ जुलैपासून सुरू झालेल्या 'सफाई अपनाओ – बिमारी भगाओ' अभियाना अंतर्गत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार लोकसहभागावर भर देत स्वच्छता आणि आरोग्य विषयक विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

नुकतेच 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' मध्ये मागील काही वर्षे सातत्याने पहिल्या ३ क्रमांकात राहिलेल्या देशातील सर्वोच्च स्वच्छ शहरांच्या विशेष गटात अर्थात 'सुपर स्वच्छ लीग' मध्ये नवी मुंबई शहराला सर्वोत्तम स्वच्छ शहराचे मानांकन प्राप्त झालेले आहे. हे मानांकन नेहमी मिळणाऱ्या क्रमांकाच्या वरचे सुपर स्वच्छ मानांकन असून ते प्राप्त झाल्यामुळे नवी मुंबईतील स्वच्छता कार्याला अधिक प्रभावीपणे गतीमानता आलेली आहे. त्यानुसार 'सफाई अपनाओ – बिमारी भगाओ' अभियानातले कार्यक्रम आता अधिक उत्साहाने आयोजन करण्यात येत आहेत.असाच एक उपक्रम ऐरोली सेक्टर ३ येथील विभाग कार्यालयाजवळील समाज मंदिरात स्वच्छतादूत योग शिबीराच्या स्वरूपात आयोजित करण्यात आला होता.

ऐरोली विभागाचे सहा. आयुक्त सुनिल काठोळे तसेच मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांच्या पुढाकारातून ईएचएस शिक्षा फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून आयोजित या योग शिबिराचा लाभ मोठ्या संख्येने उपस्थित राहून ऐरोली विभागातील स्वच्छतामित्र आणि स्वच्छतासखी यांनी घेतला.